

# एक प्रयास

शौर्य काबरा

# अनुक्रमणिका

बचतीची सवय..........................01-07

जय आणि जादूच्या बिया................08-13

बँकेच्या सेवा............................14-16

रुपयाच्या मूल्यात घट....................17-22

कर्जाचा धडा............................23-29

संपत्तीचे वेगवेगळे वाटप करणे............30-34

उत्तर तालिका............................35-37

# शौर्य काबरा

## एक ध्येयवेडा तरूण / मुलगा / युवक



शौर्य हा म्हटलं तर १६ वर्षाचा एक अल्लड मुलगा, मात्र वैश्विक मूल्ये आणि जीवनातील पैलूविषयी त्याची परिपक्वता वाखाणण्याजोगीच.

तो त्याच्या जबाबदाऱ्या लिलया पार पाडतो आणि तेच तर त्याच्या व्यक्तिमत्वाचं खरं इंगित आहे. इप्सित साध्य करण्यासाठी मळलेली पायवाट हाताळणे हा शौर्य काब्राचा स्वभाव नाही. तो सह्रदयी आहे, आपल्यामधील गरीबांप्रती त्याचं काळीज तीळ-तीळ तुटते.


आपल्या भोवतालचा समाज, पर्यावरण आणि आर्थिक बाबींबद्दल अगदी सुस्पष्ट विचारधारा जोपासत - अगदी कोवळ्या वयातच - त्याने दोन उद्बोधक उपक्रम हाती घेतले आहेत.
ह्यापैकी पहिला म्हणजे दुर्बळ घटकांना आपले आर्थिक मेळ बसवण्याचे प्राथमिक धडे देणे व आपले स्वत:चे आर्थिक स्रोत अधिकाधिक भरभक्कम करणे आणि दुसरा उपक्रम म्हणजे फिनटेकबद्दल घेतलेला ध्यास इतरांपर्यंत पोहचवणे. १६ वर्षाच्या त्याच्या समवयस्कांप्रमाणेच तो आपल्या आवडी-निवडी जोपासत आहेच. बास्केटबॉल व गाणं त्याला खूप आवडते. मात्र, त्यापुरताच मर्यादीत न राहता त्याच्यासारखे नवजवान विचारही करणार नाहीत अशा बिझनेस आणि आर्थिक जगतातील खाणा-खुणांचा त्याला ध्यास लागलेला आहे. आकडेंडीत तो एक अवलिया आहे हा काही कर्म-धर्म संयोगचा नाही.

त्याचप्रमाणे आज शौर्यचे समवयस्क जेव्हा मनाला भुरळ पाडणाऱ्या विश्वात मशगुल आहेत, त्याने आपलं ध्येय ठरवलं आहे आणि "सिम्प्लीफिन्टेक" व "एक प्रयास" या सारखे दोन उपक्रम साकारले आहेत. ह्या दोन्ही उपक्रमाद्वारे त्याला आपले आर्थिक ज्ञान अधिक प्रगल्भ करावयाचे आहे आणि ह्या क्षेत्रातील तज्ञांचे ज्ञान अधिकाधिक समृध्द करून त्याचा फायदा तळागाळातील लोकांना करून द्यायचा आहे.

"सिम्प्लीफिन्टेक" हा एक असा प्लॅटफॉर्म आहे, ज्याद्वारे तरूणांना फिन्टेकबद्दल अर्थजगताची तोंडओळख करून दिली जाते; फिन्टेक तज्ञ सत्र बोलावून आर्थिक बाबीतील गुंतागुंती सोप्या शब्दात मांडतात. "एक प्रयास" द्वारे भारतातील खेड्यापाड्यांधील लोकांना आर्थिक विषयात प्रगल्भ करण्याचा शौर्यचा मानस आहे. अशा प्लॅटफॉंद्वारे लोकांध्ये आर्थिक विषयाबद्दल जनजागृती करून खेड्यापाड्यांधील गोरगरीबांना सबळ व सक्षम करण्याचा त्याने जणू विडाच उचलला आहे.
शौर्य काब्रा हा एक ध्येयवेडा जवान आहे. आजच्या घडीला त्याचं तारूण्यसुलभ रक्त जरी सळसळत असलं तरी त्याच्या बुध्दीमत्तेला परिपक्व विचाराची झालर आहे. ध्येयाने पछाडलेले त्याचे डोळे आणि अंगात सळसळणारं रक्त आपल्याला त्याच्या प्रगल्भ विचारधारणेची प्रचितीच देत नाही तर त्याच्या उज्वल भविष्याची एक झलक दाखवते आणि तो दिवस फार काही लांब नाही. स्वत:चा फिन्टेकस्टार्ट-अप सुरू करण्याचा त्याचा मानस आहे.

# बचतीची सवय

(हरीश आणि गीता)



हरीश आणि गीता आपली सुटी घालवण्यासाठी एका अशा विलक्षण ठिकाणी गेले होते जिथे अत्यंत सुंदर मिठायांनी बनवलेले घर होते.

पण आता परत घरी पोहचण्यास त्यांना पूर्ण दहा दिवस लागणार होते.

या संपूर्ण प्रवासात खाण्यासाठी त्यांच्याजवळ केवळ १०० लाडू होते.

त्यांना ते संपूर्ण १० दिवस पुरतील अशी त्यांची वाटणी करायची होती.



हरीश हुशार होता कारण त्याने आतापर्यंत खाल्लेल्या लाडूंचा हिशोब ठेवला होता. पुढेही
आपल्याला काही त्रास होऊ नये
अशा विचार करून त्याने तो खात असलेल्या लाडूंचा हिशोब ठेवायला सुरवात केली. हा
हिशोब चांगल्या पद्धतीने
ठेवण्यासाठी त्याने त्याचे स्वतःचे एक बजेट बनवले की बदलत्या हवामानानुसार तो खात
असलेल्या लाडूंची संख्या किती
कमी करू शकेल. जेणेकरून ते १०० लाडू १० दिवस आरामात पुरतील.
त्यासाठी त्याने एक कोष्टक तयार केले आणि बदलत्या हवामानात तो किती लाडू खाऊ
शकेल याचा हिशोब ठेवला. पण हे
बजेट त्याला तितकेसे बरोबर वाटले नाही म्हणून त्याने आणखी एक बजेट तयार केले.

| दिवस | हवामान | लाडू |
|---|---|---|
| पहिला दिवस | ठीक हवामान | 10 लाडू |
| दुसरा दिवस | खराब हवामान | 15 लाडू |
| तिसरा दिवस | चांगले हवामान | 5 लाडू |
| चौथा दिवस | खराब हवामान | 15 लाडू |
| पाचवा दिवस | ठीक हवामान | 10 लाडू |
| सहावा दिवस | चांगले हवामान | 5 लाडू |
| सातवा दिवस | ठीक/ खराब हवामान | 12/13 लाडू |
| आठवा दिवस | खराब हवामान | 15 लाडू |
| नववा दिवस | चांगले हवामान | 5 लाडू |
| दहावा दिवस | ठीक/ खराब हवामान | 12/13 लाडू |



आपल्या ह्या कोष्टकाच्या मदतीने हरीशने हिशोब केला की त्याला संपूर्ण हिवाळ्यात जवळजवळ १०३ ते १०५ लाडूची आवश्यकता भासेल. पण त्याच्यापाशी तर केवळ १०० लाडू होते. म्हणून त्याला असा काही मार्ग काढायला हवा होता की ज्यामुळे त्याची रोजची लाडू खायची सवय तो थोडी कमी करू शकेल.

हरीशने रोजच्या हिशोबाने लाडूंचे वाटप करायला सुरवात केली तेव्हा त्याला जाणवले की तो जर खराब हवामानात एकाच ठिकाणी राहिला आणि चांगले हवामान असताना त्याने पुढचा प्रवास केला तर त्याची शक्ती कमी वापरली जाईल त्यामुळे कमी लाडू खाऊन सुद्धा त्याचे भागू शकेल आणि इतर दिवसांच्या तुलनेत, जेव्हा हवामान खराब असेल तेव्हा तो आपल्या शिल्लक राहिलेल्या लाडूतील थोडे जास्त लाडू खाऊन आपली शक्ती मिळवू शकेल.



| दिवस | हवामान | लाडू |
|---|---|---|
| पहिला दिवस | ठीक हवामान | 11 लाडू |
| दुसरा दिवस | खराब हवामान | 12 लाडू |
| तिसरा दिवस | चांगले हवामान | 6 लाडू |
| चौथा दिवस | खराब हवामान | 12 लाडू |
| पाचवा दिवस | ठीक हवामान | 11 लाडू |
| सहावा दिवस | चांगले हवामान | 6 लाडू |
| सातवा दिवस | ठीक/ खराब हवामान | 11/12 लाडू |
| आठवा दिवस | खराब हवामान | 11 लाडू |
| नववा दिवस | चांगले हवामान | 6 लाडू |
| दहावा दिवस | ठीक/ खराब हवामान | 11/12 लाडू |

हरीशने या कोष्टकानुसार गणित केले तेव्हा त्याच्या लक्षात आले की त्याला ९९ ते १०१ लाडू पाहिजेत. या कोष्टकाची योग्य प्रकारे अंमलबजावणी केली तर त्याला हिवाळ्याच्या ह्या १० दिवसांत (१०१+९९)/२ म्हणजे १०० लाडूच लागतील, जे त्याच्यापाशी आधीच आहेत. आणि तो राहिलेल्या हिवाळ्यात आपला प्रवास पूर्ण करू शकेल.



याच्या उलट गीताने आपल्या लाडूंचे पद्धतशीर वाटप केले नाही. अशा प्रकारे गीताने संपूर्ण १० दिवसांच्या प्रवासात, मागचा पुढचा विचार न केल्याने तिचे लाडू संपून गेले. लाडू हवामानानुसार केव्हा, किती वेळा, किती प्रमाणात खायचे याच्या कोणत्याही हिशोबाचे गणित तिने ठेवले नाही.


| दिवस | हवामान | लाडू |
|---|---|---|
| पहिला दिवस | ठीक हवामान | 11 लाडू |
| दुसरा दिवस | खराब हवामान | 12 लाडू |
| तिसरा दिवस | चांगले हवामान | 11 लाडू |
| चौथा दिवस | खराब हवामान | 10 लाडू |
| पाचवा दिवस | ठीक हवामान | 12 लाडू |
| सहावा दिवस | चांगले हवामान | 10 लाडू |
| सातवा दिवस | ठीक/ खराब हवामान | 13 लाडू |
| आठवा दिवस | खराब हवामान | 11 लाडू |
| नववा दिवस | चांगले हवामान | 10 लाडू |
| दहावा दिवस | ठीक/ खराब हवामान | 0 लाडू शिल्लक |



हरीश आपले लाडू योग्य प्रकारे शिल्लक ठेवू शकला कारण त्याने आपल्या लाडूंचे योग्य प्रकारे वाटप केले होते पण गीताने तसे केले नाही. ज्यामुळे दहाव्या दिवशी खाण्यासाठी गीतापाशी एकही लाडू शिल्लक नव्हता. तिने पहिल्यापासून बजेट आखले असते तर तिच्यावर अशी वेळ आली नसती.

अशा प्रकारे हरीशने शेवटपर्यंत आपले लाडू शिल्लक ठेवणे योग्य मानले आणि आपल्याला बचतीचा एक प्राथमिक मार्ग दाखवला, जिथे आपण एका दिवसात किती लाडू खात आहोत किंवा एका दिवसात किती पैसे खर्च करत आहोत याची तुलना आपल्यापाशी असलेल्या एकूण लाडू किंवा पैशांशी करून एक बजेट तयार करू शकतो.

## खाली दिलेले शब्दकोडे पूर्ण करा




### आडवे शब्द:

२. हरीशला शेवटपर्यंत आपल्या लाडूंची ............करणे योग्य वाटले.

३. हरीशने रोजच्या हिशोबाने लाडूंचे ............करणे सुरू केले.

### उभे शब्द:

१. गीताला आपल्या लाडूंचे ............न करणे महागात पडले.

२. हिशोब व्यवस्थितपणे ठेवण्यासाठी हरीशने आपले एक............तयार केले.

# जय आणि जादूच्या बिया



जय एक गरीब घरचा मुलगा होता, जो आपल्या कुटुंबाबरोबर एका गावात राहत होता. प्रत्येक गरीब कुटुंबाप्रमाणेच त्याच्या कुटुंबालाही एकाच गोष्टीची चिंता असे की काहीतरी करून एक वेळची भाकरी मिळावी आणि घरातले कुणीही उपाशी पोटी झोपू नये. त्यांच्यापाशी रोजच्या गरजांच्या नाममात्र वस्तू होत्या, पण एक वस्तू त्यांच्यापाशी होती जी खूप मूल्यवान होती आणि ती त्यांच्या कुटुंबाची शान होती, त्यांची वडीलोपार्जित गाय.



एक दिवस जय आपल्या गायीला कुरणात चरायला घेऊन जात होता तेव्हा त्याने थोड्या अंतरावर एक अजब आकृती पाहिली. पण जसजसा तो जवळ आला तसे त्याला जाणवले की तो एक मनुष्य होता. त्याने एक राखाडी रंगाचा झगा घातला होता, एका हातात लांब छडी होती आणि दुसऱ्या हाताने तो आपल्या खिशात काहीतरी शोधत होता. जयला समजेना की तो मनुष्य काय शोधत होता. जयने लगेच त्याच्याकडे पाहून त्याला विचारले की तुम्ही कोण आहात? त्या अनोळखी माणसाने तो एक जादूगार असल्याचे त्याला सांगितले. त्याने त्याचे नाव न सांगता सांगितले की त्याच्यापाशी काही जादूच्या बिया आहेत, ज्या उत्तुंग उंचीपर्यंत पोचून आकाशाला सुद्धा स्पर्श करू शकतात. ते ऐकून जयला आश्चर्य वाटले आणि त्याने त्या जादूच्या बिया पाहण्याची उत्सुकता दाखवली. त्या अनोळखी माणसाने खिशातून हात बाहेर काढला आणि मूठ उघडून तो म्हणाला, या आहेत पाच जादूच्या बिया. आता तर त्याने निश्चयच केला की तो काहीही करून त्या घेईल. त्याने वेळ न दवडता त्या बियांची किंमत विचारली.



अनोळखी माणसाने त्वरित सांगितले,

त्यांची किंमत तुमची गाय आहे. हे एकून जय एक मिनीटभर मागे सरकला, पण नंतर त्याने आपली गाय विकण्याचे ठरवले आणि त्या अनोळखी माणसाबरोबर सौदा करून बियांच्या बदल्यात आपली गाय दिली. जय लगेच आपल्या घरी आला आणि त्याने त्या बिया मातीत पेरल्या, त्यांना पाणी घातले, आणि आपल्या पलंगावर येऊन झोपला.



दुसऱ्या दिवशी सूर्य उगवताच तो जसा बिया पाहण्यासाठी बाहेर आला तसा त्याच्या डोळ्यांवर विशासच बसेना, तो एक चमत्कार पाहत होता की त्याच्या पुढ्यात फळांनी लगडलेले एक पाच फूट उंचीचे झाड उभे होते. ज्याच्या प्रत्येक फांदीवर फळेच फळे होती.



त्याने ती फळे पटापट तोडली आणि
ती विकायला तो बाजारात घेऊन
गेला. ती फळे विकून आलेल्या
पैशांतून त्याने खत खरेदी केले आणि
जिथे झाड उगवले होते तिथल्या
मातीत मिसळले. नंतर दुसऱ्या
दिवशी जेव्हा त्याने झाड पाहिले
तेव्हा त्याच्या आश्चर्याला
पारावर उरला नाही कारण आता त्या
झाडावर कालच्यापेक्षा मोठी आणि
दुप्पट फळे लागली होती.

त्याने पटापट ती सगळी फळे तोडली आणि पुन्हा ती विकून आलेल्या पैशांतून खत खरेदी करून झाड असलेल्या ठिकाणी मातीत चांगले मिसळले. दुसऱ्या दिवशी पुन्हा फळांचा आकार आणि संख्या चौपट झाली होती. अशा प्रकारे जय आपली कमाई पुन्हा खत खरेदी करण्यात गुंतवत राहिला ज्यामुळे फळे

चौपटवरून आठपट,
आठपटवरून सोळापट आणि
नंतर सोळापटवरून बत्तीसपट
अशी आकार आणि संख्येने
जोरात वाढत राहिली.
शेवटी झाड मोठे होण्याबरोबरच
फळांनी एवढे भरून गेले की जय
आता आपले राहिलेले जीवन
सहजपणे आरामात व्यतीत करू
शकत होता.



जसे झाड मोठे होण्यासाठी आणि जास्त फळे मिळण्यासाठी खत घातले गेले तसेच आपल्यालाही आपली कमाई दुप्पट करण्यासाठी पुनर्गुंतवणूक केली पाहिजे, कारण कमाईतील थोड्या हिश्शाची गुंतवणूक करण्याची ही प्रक्रिया आपल्याला अत्यंत जलद, सतत आणि भरपूर फायदा म्हणजे परतावा देत राहते.

तथापि याची शक्यता खूप कमी आहे, तरीही आपण असे समजूया की आपल्या गुंतवणूकीवर, दर दिवशी आपल्याला १००% परतावा (पुन्हा लाभ) प्राप्त होतो आणि जर आपली प्रारंभीची गुंतवणूक १००० असेल, तर –

| दिवस | गुंतवणूक | फायदा + गुंतवणूक (पुनर्गुंतवणूक) |
|---|---|---|
| 1 | 1000 | 2000 |
| 2 | 2000 | 4000 |
| 3 | 4000 | 8000 |
| 4 | 16000 | 32000 |
| 5 | 64000 | 128000 |
| 6 | 256000 | 512000 |

सहाव्या दिवशी तुमची गुंतवणूक, तुम्ही गुंतवलेल्या मूळ रकमेवरून वाढून ५१२ पट होईल. म्हणून पैशांपासून पैसे मिळवण्याची ही प्रक्रिया आपल्याला सांगते की जर आपण आपल्या कमाईतील काही पैसे इतर ठिकाणी गुंतवू लागलो, तर आपण पुनर्गुंतवणूकीची क्षमता वाढवून जास्त फायदा मिळवू शकतो.

नाम ____________________

# शब्दकोडे:

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| X | 1 | X | X | 5 | X |
| X | | X | 4 | | |
| 2 | | X | X | X | X |
| X | | X | X | X | X |
| X | | X | X | X | X |
| X | | X | X | X | X |
| X | 3 | | | X | X |

## आडवे शब्द:

२) फळे विकून आलेल्या पैशातून जयने ........................ खरेदी केले.

३) पैसे गुन्हा गुंतवत राहिल्यामुळे जयची ........................ वाढत राहिली.

५) उत्पन्नाची पुन्हा गुंतवणूक केल्यानंतर जो परतावा मिळतो, त्याला ........................ म्हणतात

## उभे शब्द:

१) फायदा आणि मूळ गुंतवणूक पुन्हा गुंतवल्यास त्याला ........................ म्हणतात.

४) जयने त्याची ........................ गाय विकून त्या पैशातून बिया खरेदी केल्या.

# बँकेच्या सेवा

## (भोलू भाजीवाला)



भोलू एक भाजीवाला होता. तो दिवसभर जी कमाई करत असे त्यापैकी अर्धे बँकेत जमा करत असे. त्याला फक्त एवढेच माहिती होते की तुम्ही बँकेत पैसे जमा करू शकता आणि गरज असेल तेव्हा काढू शकता. एक दिवस भाजीवाल्याची त्याचा मित्र हरियाशी भेट झाली. भोलूने हरियाला विचारले की तू इथे कशासाठी आला आहेस?

हरियाने त्याला सांगितले की त्याने आपल्या मुद्दलाच्या पैशांनी एक खेळण्याचे दुकान उघडले होते आणि त्यात त्याचे सगळे पैसे बुडाले. म्हणून तो बँकेकडून काही पैसे कर्जाऊ घेण्यासाठी आला आहे ज्यांचा उपयोग तो कपड्यांचे दुकान उघडण्यासाठी करेल. पण कर्जाच्या बदल्यात त्याला बँकेला दरमहा एक भाडे द्यावे लागले ज्याला हप्ता म्हणतात.




भोलू हरियाचे बोलणे खूप लक्ष देऊन ऐकत होता. त्याने हरियाला सांगितले की गेल्या महिन्यात त्याला जास्त नफा झाला आहे. त्याने हरियाला विचारले की अशी एखादी पद्धत आहे का ज्यामुळे मी त्या नफ्याचा अधिक चांगला उपयोग करू शकेन? हरियाने सांगितले की तुला त्या नफ्याचा पुन्हा फायदा मिळवायचा असेल तर, तू त्याची पुनर्गुंतवणूक करू शकतोस जेणेकरून तुला त्यावर व्याज मिळत राहील. त्यासाठी तुला बँकेत एका ठराविक कालावधीसाठी एक खाते उघडावे लागेल आणि त्यात तुझ्या पैशांची पुनर्गुंतवणूक करत राहावी लागेल. बँक सुद्धा तुझ्या खात्यात एक ठराविक रक्कम टाकत राहील. त्याला लाभांश म्हणतात, जो तुला कधीही काढता येईल.




भाजीवाल्याला हे ऐकून खूप आनंद झाला. ही पद्धत त्याला खूप आवडली कारण हा दोन्ही बाजूंनी फायद्याचा सौदा होता. यात बँकेला सुद्धा नियमितपणे पैसे मिळत होते ज्यातून ती व्याजाच्या रुपाने तुम्हाला थोडे थोड़े पैसे परत देत होती. तुमचे पैसे तिथे सुरक्षित राहण्याबरोबरच वाढतही होते.

## शब्दांच्या त्यांच्या अर्थाशी जोड्या लावा

| | |
|---|---|
| नफा पुन्हा गुंतवणे | मुद्दल |
| पहिले अस्सल पैसे म्हणतात | पुनर्गुंतवणूक |
| एखाद्या कामात पैसे वापरणे | जमा करणे |
| बँकेत ठराविक कालावधीसाठी ठेवलेल्या रकमेवर लाभ मिळणे | हप्ता |
| बँकेतून पैसे कर्जाऊ घेतल्यावर दरमहा कापले जाणारे पैसे | लाभांश |
| बँकेत आपल्या खात्यात पैसे भरणे | गुंतवणूक |

# रुपयाच्या मूल्यात घट

(राजा विक्रम सिंह)



राजा विक्रम सिंहाला सोनेरी स्पर्शाचं वरदान मिळालं होतं. तो ज्या वस्तूला स्पर्श करेल ती सोन्यात रुपांतरित होत असे. त्याच्या या शक्तीने त्याने आपले सिंहासन, गाड़ी तसेच महाल सोन्याचा बनवून घेतला होता. तो खूप सामर्थ्यवान राजा झाला होता कारण त्याच्याजवळ सर्वात मूल्यवान गोष्ट होती, सोने. ते सोने सर्व राजे-महाराजे मिळवू इच्छित होते.

अनेक राजे हजारोंच्या संख्येत वेगवेगळे प्रस्ताव घेऊन त्याच्याकडे येत होते. जसे की चांगले रेशीम, अनेक एकर जमीन, आणि असे अमुल्य मसाले ज्यांचे लोकांनी कधी नावही ऐकले नव्हते. राजा ते प्रस्ताव स्वीकारत असे. छोट्या छोट्या आनंदाच्या बदल्यात सर्वांना हजारो किलोग्रामपर्यंत सोने देऊ करत असे. आणि त्याने असे का करू नये, जर तो कधीही सोने बनवू शकत होता.



जेव्हा एखादा राजा त्याच्याकडे अगदी छोटा प्रस्ताव घेऊन येत असे ज्याची किंमत सोन्याच्या बरोबरीने नसे, तेव्हा राजा विक्रम सिंह ते मान्य करून घेत असे आणि त्याच्या बदल्यात सोने देत असे. हळूहळू वर्षे निघून गेली तशी त्याच्याकडे येणाऱ्या व्यापाऱ्यांची संख्या कमी झाली.



आधी त्याच्याकडे राजे-महाराजांचे येणे जाणे जास्त होते पण आता सामान्य लोकांची संख्या राजे महाराजे आणि श्रीमंतांच्या तुलनेने वाढली. त्याच्याकडे सोन्याची मागणी करण्यासाठी जास्त संख्येने सामान्य लोक येऊ लागले. पण लवकरच ते सामान्य लोकही त्याच्याकडे येणे बंद झाले. तेव्हा राजा विक्रम सिंहाला आश्चर्य वाटले की इतक्या महिन्यात त्याच्याकडे व्यापार करायला कुणी आले नाही, आता कुणाला सोन्याची गरज राहिली नाही?

या रहस्याचा शोध लावण्यासाठी राजा वेष बदलून शहरात फेरफटका मारायला निघाला. जेव्हा राजा आपल्या शहरातील अनेक गल्लया, घरातून फिरला तेव्हा त्याच्या शहरात असलेले इतके सोने पाहून त्याला वाटले की आपल्या शहराचे नाव बदलून सोन्याचे शहर ठेवावे. जिकडे पहावे तिकडे त्याला सोनेच सोने दिसत होते.

तो जेव्हा परत आला तेव्हा त्याला त्याचे शहर खूप प्रगती करत आहे, तसेच सगळ्यांकडे सोने आहे याचा विचार करून आनंद आणि समाधान वाटले. पण त्याला हे रहस्य उलगडले नाही की आता कुणाला सोने का नको आहे. राजा विक्रम सिंह स्वतःशीच म्हणाला की ही गोष्ट मला अजूनही समजत नाही. त्याने तात्काळ आपला आर्थिक व्यवहार पाहणाऱ्या मंत्र्याला बोलावले आणि त्याला विचारले की आता कुणालाही सोने का नको आहे?





मंत्री म्हणाला, राजे साहेब! आता लोकांकडे खूप सोने जमा झाले आहे. लोकांना आता वेगवेगळ्या गोष्टींची गरज आहे. प्रत्येक ठिकाणी एवढे सोने आहे की त्याला आता काही किंमत राहिली नाही. आता ते त्यांच्यासाठी निरुपयोगी झाले आहे. आता सगळ्यांकडे सोने असल्यामुळे त्याची कुणी देवाण-घेवाण सुद्धा करू इच्छित नाही. सोन्याच्या बदल्यात लोकांना आता रेशमासारखी किंमती आणि मूल्यवान वस्तू खरेदी करायची आहे. या गोष्टीतून आपल्याला शिकायला मिळाले की कोणत्याही वस्तूची किंमत ती कमी असते तोपर्यंतच असते. ती जर जगात गरजेपेक्षा जास्त झाली तर लोक ती खरेदी करू इच्छित नाहीत, त्यामुळे त्याची किंमत कमी होईल. या स्थितीला घट (पतन) म्हणतात.

# रुपयाच्या मूल्यात घट

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| द | म | किं | म | ती | ल | व | श | घ |
| य | क | आ | त | ग | म | न | ग | ट |
| अ | धि | क | ल्य | मं | त्री | आ | क | र |
| त्व | अ | न | वे | मा | री | अ | ष | अ |
| म | च | ग | ग | स | बे | र | वि | न |
| क | सो | क | ळे | धि | का | ग | क्र | मो |
| अ | ने | म | वे | म | र | द | म | ल |
| ल | पा | न्य | ग | ल | आ | हा | प | ल्य |
| ह | ख | ई | ळे | को | मू | ल्य | वा | न |

१. मंत्री
२. मूल्यवान
३. अनमोल
४. बेकार
५. विक्रम
६. घट
७. किंमती
८. अधिक
९. सोने
१०. वेगळे-वेगळे

# कर्जाचा धडा



एकेकाळची गोष्ट आहे. गोरी नावाची एक मुलगी आपली सावत्र आई व आपल्या सावत्र बहिणींबरोबर राहत होती. त्या सगळ्या तिच्याबरोबर अत्यंत वाईट वागत होत्या. तिच्याकडून दिवसभर कामे करून घेत, पण स्वतः मात्र आराम करत.

गोरी आपल्या नावाप्रमाणेच दूधासारखी गोरी होती, ती इतकी सुंदर होती की कुणी तिला एकदा पाहिले की तो तिला पाहतच राहत असे. तिच्या सावत्र बहिणी तिच्या सौंदर्यावर जळत असत. त्यांना तिचा तिरस्कार वाटत असे.

तिच्या कुटुबियांनी तिला त्यांच्यापासून वेगळे केले होते. तिच्याबरोबर एक म्हातारी स्त्री नसती तर ती एकदम एकटी पडली असती. त्या म्हाताऱ्या स्त्रीने तिच्या वाईट काळात तिला मदत केली, तिची काळजी घेतली, किंबहुना तिला तिच्या कुटुंबाकडून न मिळालेले प्रेम दिले. ती म्हातारी स्त्री म्हणजेच तिचे खरे कुटुंब होते.



एक दिवस गोरीच्या घराच्या बाहेर एक पत्रक लावले होते ज्यात लिहीले होते की सगळ्या कुमारी मुलींना निमंत्रण देण्यात येते की त्यांनी राजमहालात यावे, जिथे राजपुत्र त्यांचे स्वागत करेल. तिकडे सर्वांनी येणे आवश्यक आहे. त्या सर्व मुलींमधील एक नशीबवान मुलगी राजपुत्राची पत्नी होईल. गोरीच्या सावत्र आईला वाटले की ही तिच्या मुलींसाठी खूप चांगली संधी आहे, पण दुर्दैवाने गोरी पण तिकडे जाणार.

गोरीजवळ चांगले कपडे नव्हते. तिच्याजवळ त्यांनी वापरलेले जुनेच कपडे होते. ते फाटके-तुटके कपडेच तिला घालावे लागले. तिने तिच्या सावत्र आईकडे नवीन कपडे मागितलेही नाहीत कारण तिला माहीत होते की ती कधीच देणार नाही. गोरीपाशी इतके पैसेही नव्हते की एखादा नवीन लेहंगा ती विकत घेऊ शकेल. तिला जाणीव होती की ती सुंदर आहेच पण तिच्याजवळ घालण्यासाठी चांगल्या पद्धतीचे कपडे नाहीत.



गोरीने त्या म्हाताऱ्या स्त्रीकडून मदत मिळवायचे ठरवले. तिने त्या म्हाताऱ्या स्त्रीला सांगितले की ती तिचे उपकार कधीच विसरणार नाही आणि वचन दिले की राणी बनल्यानंतर ती तिला मदत करेल. म्हाताऱ्या स्त्रीने रात्रभर जागून तिच्यासाठी एक सुंदर लेहंगा तयार केला. दुसऱ्या दिवशी सगळ्या मुली राजमहालाकडे जायला निघाल्या. गोरी सुद्धा एखाद्या राजकन्येप्रमाणे नटली.



आपण पोचलो! सावत्र आई मोठ्याने म्हणाली. तिने जसे बाहेरचे दृश्य पाहिले तशी ती एक क्षणभर मागे झाली, तिचा तिच्या डोळ्यांवर विशास बसेना. तिने एक खोलवर शास घेतला आणि ती महालाचे सौंदर्य पाहून विस्मित झाली. महाल मोठा तर होताच पण तितकाच सुंदरही होता. त्याचे ५ मनोरे इतके उंच होते की जणू ते मनोरे वरून संपूर्ण शहराची शोभा पहात आहेत असे वाटावे. त्या मनोऱ्यांना लागून चांगल्या तासलेल्या संगमरवरी आरस्पानी राखाडी रंगाच्या भिंती होत्या. आत जाण्यासाठी जवळ जवळ ५ किलोमीटर लांबीचा वळणा-वळणाचा रस्ता होता. त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पहारा देत चंदेरी रंगाचे लोखंडी चिलखत घालून दोन सैनिक उभे होते. ते चिलखत इतके चमकत होते की त्यात स्वतःचा चेहरा पाहता यावा.





ङ्गकरकरङ्घ आवाज करत दरवाजा उघडताच सगळ्या महालात गेल्या. तिथे ५० मीटर लांबीचे दालन होते, ज्याच्या दोन्ही बाजूंना खुर्च्या ठेवलेल्या होत्या. त्याच्याच समोर वरच्या दिशेला २४ कॅरट सोन्याने बनवलेले सिंहासन होते, ज्यावर पन्ना तसेच इतर रत्ने जडवलेली होती. तेवढ्यात राजा आला आणि म्हणाला, तुम्ही सर्व आमच्या राजपुत्रासाठी एक उमेदवार म्हणून इथे आल्या आहात, जी कुणी राजपुत्राला सर्वात पसंत पडेल ती राणी होईल.

शेकडो मुली दिवसभर महालात येत राहिल्या, लवकरच गोरीची वेळ आली. राजपुत्राला नमस्कार करून ती म्हणाली, माझे नाव गोरी आहे आणि वाकून मुजरा केला. तिला पाहताच राजपुत्राचे डोळे चमकले आणि तो तोंड वासून पहातच राहिला.

राजपुत्राला गोरी इतकी सुंदर वाटली की त्याने तिला आपली राणी बनवायचे ठरवले. सावत्र आईला खूप राग आला कारण तिच्या मुलींना राजपुत्राने एक संधी सुद्धा दिली नव्हती, पण तिने आपला राग दाबून ठेवला.



शेवटी गोरी आता एक राणी झाली होती. एक राणी जिचे संपूर्ण शहरावर राज्य होते. सगळे ऐशर्य आणि समाजातल्या श्रीमंत लोकांबरोबर उठणे-बसणे याचा विचार म नात येताच तिचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्या आनंदाच्या भरात ती गर्विष्ठ झाली आणि महालात निघून गेली.



जेव्हा ती महालात आरामात राहू लागली तेव्हा एक म्हातारी स्त्री तिचे अभिनंदन करायला आली, पण तिने तिला दूर हाकलून महालातून निघून जायला सांगितले. तिला आता कुणाशी संबंध ठेवायचे नव्हते कारण ती आता राणी होती. गर्वाने तिच्या डोक्याचा ताबा घेतला होता.

गोरीने त्या म्हाताऱ्या स्त्रीला एक क्षणसुद्धा वेळ दिला नाही की तिला मदत करण्याचे वचन पूर्ण केले नाही. आठवड्यावर आठवडे गेले, ती म्हातारी स्त्री तिला भेटायला येत राहिली आणि गोरी तिला हाकलत राहिली.



शेवटी म्हाताऱ्या स्त्रीला जाणीव झाली की गोरी तिला अशीच धुडकावत राहणार. तेव्हा ती रागाने महालात आली आणि ओरडून तिला शाप देत म्हणाली,

राजपुत्र आता तुला विसरून जाईल आणि तू पुन्हा राणीची नोकर होशील!

नंतर तसेच झाले.

या गोष्टीतून आपण हे शिकलो की आपण जेव्हा एखाद्या व्यक्तीकडून कर्ज घेतो तेव्हा ते नक्की परत करावे. तुम्ही तसे केले नाहीत तर, त्याचे तुम्हाला फार वाईट परिणाम भोगावे लागू शकतात. म्हणून आवश्यक कामांसाठीच कर्ज घ्यावे आणि त्याचा हुशारीने वापर करावा आणि त्याची वेळेवर परतफेड करावी.



## कर्जाचा धडा

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| द | म | घे | णे | ती | ल | व | श | गि |
| य | क | आ | त | ग | म | न | ग | रा |
| दे | धि | क | ल्य | मं | त्री | आ | क | त |
| णे | अ | न | अ | मा | री | अ | र्ज | ट |
| म | च | ग | ल | स | बे | र | वि | अ |
| प्र | दा | न | न | धि | का | ग | क्र | उ |
| अ | ना | म | अ | म | र | द | म | धा |
| ल | पा | न्य | ल | ल | आ | हा | प | र |
| प | र | त | फे | ड | की | म | त | स |

१. घेणे
२. देणे
३. कर्ज
४. उधार
५. प्रदान
६. परतफेड

# संपत्तीचे वेगवेगळे वाटप

(मोहन आणि गोपाळ)



मोहनने त्याची सगळी बर्फी एका डब्यात ठेवली आणि कपाटात लपवली. तो विचार करत होता की ही जागा अगदी योग्य आहे आणि त्याची बर्फी तिथे सुरक्षित आहे. रामू, श्यामू आणि मीनू, कुणीही बर्फी शोधायला तिथे येणार नाही. असेच होईल का, की नाही?

एक दिवस सगळे खोलीत खेळत होते तेव्हा मोहनने काहीतरी जोरात पडल्याचा आवाज ऐकला. त्याला वाटले हा बहुधा भांडी पडल्याचा आवाज असावा आणि त्याने त्याचा फार विचार केला नाही. रात्री तो गुपचूप थोडी बर्फी घ्यायला गेला. तो मनातल्या मनात म्हणत होता की आता बराच वेळ झाला आहे, थोडी बर्फी खाऊ. हे काय? कुठे गेली माझी बर्फी? डबा कुठे गेला? मोहनला काळजी वाटू लागली की त्याच्या बर्फीचे काय झाले?




मनात नसूनही मोहनने धाडस केले, कपाटाच्या मागे त्याला त्याचा डबा दिसला, तो जोरात ओरडला. अरे! हे काय झालं! डबा तर एकदम रिकामा आहे. ती कुणी खाल्ली. मला गोपाळला सांगितलेच पाहिजे. पटकन धावत तो गोपाळकडे गेला, त्याला सांगितले की आपली सगळी बर्फी नाहीशी झाली.



त्याला वाटले होते की हे ऐकून गोपाळला दुःख होईल.

पण गोपाळच्या चेहऱ्यावर कोणतेच भाव नव्हते. तो मोहनला म्हणाला फक्त तुझी बर्फी, माझी नाही. गोपाळची बर्फी अजून त्याच्यापाशी कशी आहे? गोपाळने मोहनला म्हटले, चल माझ्या मागोमाग ये. मोहनने तसेच केले.



त्या पडद्यांच्या मागे काय आहे? व्वा! बर्फी!

पण ती तिथे कशी आली? मोहनने गोपाळला विचारले. गोपाळने मोहनला सांगितले, मी माझी सगळी बर्फी केवळ एकाच ठिकाणी ठेवली नव्हती तर संपूर्ण घरात वेगवेगळ्या १० ठिकाणी लपवली होती. म्हणून तुझी जी बर्फी हरवली त्यात माझ्या बर्फीचा केवळ १० वा हिस्सा होता.

काय? तुझ्या बोलण्याचा अर्थ काय आहे? मोहन म्हणाला.

गोपाळने मोहनला समजावले की त्याने त्याची बर्फी लपवण्यासाठी वेगवेगळ्या जागा निवडल्या, फक्त एक जागा नाही.

या गोष्टीतून आपण हे शिकलो की आपण आपले सर्वस्व एकाच गोष्टीवर पणाला लावू नये. बोलण्याचा अर्थ असा आहे की आपले सगळे पैसे, मालमत्ता एकाच ठिकाणी न गुंतवता, अनेक ठिकाणी थोडी थोडी गुंतवली पाहिजे. जेणेकरून नुकसान झाले तरी तुम्हाला फारसा धक्का बसणार नाही. त्यामुळे तुमचा दुसरीकडे गुंतवलेला पैसा तरी सुरक्षित राहील.

तुम्ही तो पुन्हा अन्य ठिकाणी गुंतवू शकता. कमी पैसा गुंतवल्यामुळे तुमचा फायदा थोडा कमी होईल हे नक्की, पण त्यात जोखीम पण कमी असेल. तुम्ही अशा प्रकारे सदैव फायदा मिळवू शकता.

## प्रश्नाची त्याच्या उत्तराशी जोडी लावा

| | |
|---|---|
| मोहनने त्याची बर्फी कशी गमावली? | त्याने अनेक ठिकाणी गुंतवणूक केली.. |
| गोपाळने त्याची बर्फी का गमावली नाही? | सदैव फायदा होत राहतो. |
| संपत्तीचे वेगवेगळे वाटप करण्याचा फायदा काय आहे? | संपूर्ण हिश्शाचे नुकसान होणे. |
| संपत्तीचे वेगवेगळे वाटप करण्याचा आणखी एक फायदा काय आहे? | नुकसान होण्याचा धोका कमी असतो. |
| डबा हरवण्यातून काय सूचित होते? | त्याने आपल्या संपत्तीचे वेगवेगळे वाटप केले नाही. |

# उत्तर कुंजी

## बचतीची सवय

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 1 ग |
| | | | णि |
| | 2 ब | च | त |
| | जे | | |
| 3 वा | ट | प | |

आडवे शब्द:

2 बचत

3 वाटप

उभे शब्द:

1 गणित

2 बजेट

## जय आणि जादूच्या बिया

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| X | 1 पु | X | X | 5 गा | X |
| X | न | X | 4 फा | य | दा |
| X | र्गु | X | X | X | X |
| 2 ख | त | X | X | X | X |
| X | व | X | X | X | X |
| X | णू | X | X | X | X |
| X | 3 क | मा | ई | X | X |

# बँकेच्या सेवा

मुद्दल – पहिले अस्सल पैसे म्हणतात

पुनर्गुंतवणूक – नफ्याची पुन्हा गुंतवणूक करणे

गुंतवणूक – कोणत्यातरी कामात पैसे वापरणे

लांभांश – बँकेत ठराविक काळासाठी जमा केलेल्या पैशांवर फायदा मिळणे

हप्ता – बँकेतून कर्ज घेतल्यावर दरमहा खात्यातून कापली जाणारी रक्कम

जमा करणे – बँकेत आपल्या खात्यात पैसे टाकण

# रुपयाच्या मूल्यात घट

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| द | म | किं | म | ती | ल | व | श | घ |
| य | क | आ | त | ग | म | न | ग | ट |
| अ | धि | क | ल्य | मं | त्री | आ | क | र |
| त्व | अ | न | वे | मा | री | अ | ष | अ |
| म | च | ग | ग | स | बे | र | वि | न |
| क | सो | क | ळे | धि | का | ग | क्र | मो |
| अ | ने | म | वे | म | र | द | म | ल |
| ल | पा | न्य | ग | ल | आ | हा | प | ल्य |
| ह | ख | ई | ळे | को | मू | ल्य | वा | न |

१. मंत्री
२. मूल्यवान
३. अनमोल
४. बेकार
५. विक्रम
६. घट
७. किंमती
८. अधिक
९. सोने
१०. वेगळे-वेगळे

# कर्जाचा धडा

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| द | म | घे | णे | ती | ल | व | श | गि |
| य | क | आ | त | ग | म | न | ग | रा |
| दे | धि | क | ल्य | मं | त्री | आ | क | त |
| णे | अ | न | अ | मा | री | अ | र्ज | ट |
| म | च | ग | ल | स | बे | र | वि | अ |
| प्र | दा | न | न | धि | का | ग | क्र | उ |
| अ | ना | म | अ | म | र | द | म | धा |
| ल | पा | न्य | ल | ल | आ | हा | प | र |
| प | र | त | फे | ड | की | म | त | स |

१. घेणे
२. देणे
३. कर्ज
४. उधार
५. प्रदान
६. परतफेड

# संपत्तीचे वेगवेगळे वाटप करणे

मोहनने त्याची बर्फी कशी गमावली?

– त्याचे आपल्या संपत्तीचे वेगवेगळे वाटप केले नाही.

गोपाळने त्याची बर्फी का गमावली नाही?

– त्याने अनेक ठिकाणी गुंतवणूक केली

संपत्तीचे वेगवेगळे वाटप करण्याचा एक फायदा काय आहे?

– नुकसान होण्याचा धोका कमी असतो

संपत्तीचे वेगवेगळे वाटप करण्याचा आणखी एक फायदा काय आहे?

– सदैव फायदा होत राहतो

डबा हरवण्यातून काय सूचित होते?

– संपूर्ण हिश्शाचे नुकसान होणे

# एक प्रयास

असं म्हणतात कि “पैसा कमावण्यासाठी घाम गाळावा लागतो, मात्र तो उधळणं म्हणजे डाव्या हातातील मळ”. खास करून, आपल्या देशातील खेडुतांना पैसा कमावण्यासाठी काबाडकष्ट करावे लागतात. मात्र फसव्या स्किम्स, लॉटरी किंवा आकर्षक इनामे जाहिर करून समाजकंटक त्यांना लिलया गंडवतात. त्यामुळे आलेला पैसा गुंतवण्याच्या बाबतीत ते नाक मुरडतात. ह्याचा परिणाम म्हणजे पैसा येतो व खर्च होतो, हातात शिल्लक काहीच राहत नाही. मग त्यात वाढ होणे तर अशक्यच.

शौर्य काब्राने हाती घेतलेला “एक प्रयास” हा उपक्रम भारतातील खेडुतांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा एक स्तुत्य प्रयत्न आहे. हाती आलेल्या पैशाचे नियोजन, गुंतवणूक, बचत, कर्ज परतफेड, मुदत ठेवी अशासारख्या आर्थिक बाबी, पुस्तके व चलत-चित्राद्वारे (ॲनिमेशन) ह्या उपक्रमार्फत अगदी सोप्या भाषेत समजावून सांगितले जाते. आर्थिक घडी विस्कटली आणि तातडीचा खर्च करावा लागल्यास गांगरून न जाता त्यावर मात कशी करावी हे देखील ह्या उपक्रमा मार्फत शिकवले जाते.

एक प्रयास - भारतातील खेडुतांच्या हाती आलेल्या पैशाचा सुज्ञपणे विनियोग करून त्यामधूनच बचत करून त्यामध्ये वाढ कशी करावी हे त्यांना पटवून देण्याचा हा एक प्रयत्न आहे, जेणेकरून ते आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील आणि त्यांचे भवितव्य उज्वल होईल.

तुम्ही एक रुपया वाचवला आहे,
म्हणजे एकप्रकारे तुम्ही एक
रुपया आणखीन कमवला आहे.



## निशुल्क वितरणासाठी

लेखक: शौर्य काबरा

www.ekprayaas.co.in